# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगाव

**'बांधकाम भवन', जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जिल्हापेठ, जळगाव-४२५००१.**
(E-mail - Address : jalgaon.se@mahapwd.com)
Web-www.mahapwd.com/दूरध्वनी क्रमांक (०२५७)-२२२७४३५/Fax.No. (०२५७)-२२२०३३२

**पदभरती सन २०१९ जाहिरात क्र. ५१३०/सा.बां. मंडळ, जळगाव/आ-१/स.से.भ./२०१९ दि. ३१/१२/२०१९**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन, शासन निर्णय क्रमांक बीसीसी२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब/मंत्रालय, मुंबई दिनांक २१ डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्रमांक ८९२८/२०१५ इतर याचिकांमध्ये दिनांक ६ जुलै २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगावअंतर्गत खालील संवर्गातील पद सरळ सेवाभरतीने सामाजिक आरक्षणअंतर्गत भरावयाची आहेत. त्यासाठी पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, जळगाव यांच्या नावाने करावे. अर्ज स्वीकारण्याचा पत्ता- कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जळगाव, 'बांधकाम भवन', जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जिल्हापेठ, जळगाव-४२५००१ या पत्त्यावर व्यक्तिशः किंवा टपालाने **दिनांक १५/१/२०२० रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठविण्यात यावेत. उमेदवार एकापेक्षा जास्त पदासाठी अर्ज करीत असेल तर त्यांनी त्यासाठी स्वतंत्रपणे अर्ज पाठवावेत.** दिनांक १५/०१/२०२० नंतर टपालाने वा कोणत्याही मार्गे प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

**रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र. | पदनाम व गट | एकूण भरावयाची पदे | वेतन बँड | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | | | | | | | सर्व साधारण पदे | एकूण भराव याची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | माजी सैनिक | महिला | खेळाडू | दिव्यांग | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | | |
| १ | कनिष्ठ लिपिक-नि-टंकलेखक (गट क) | ६ | एस-६ :- १९९००-६३२०० | अनुसूचित जमाती | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ६ |
| २ | अनुरेखक (गट-क) | १ | एस-७ :- २१७००-६९१०० | अनुसूचित जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३ | शिपाई (गट-ड) | १ | एस-१ :- १५०००-४७६०० | अनुसूचित जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | एकूण | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ६ | ८ |

| अ.क्र. | पदनाम व गट | किमान शैक्षणिक अर्हता (म.शा.राजपत्र सा.प्र.वि.अधिसूचना दि. ६/६/२०१७) |
|---|---|---|
| १. | कनिष्ठ लिपिक-नि-टंकलेखक (गट क) | १) ज्यांनी पदवी धारण केलेली आहे.<br>२) ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादा किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादा शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे.<br>३) एम.एस.सी. आय.टी. परीक्षा किंवा संगणक ज्ञानाची समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावा किंवा नियुक्तीनंतर दोन वर्षात सदर परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. |
| २. | अनुरेखक (गट क) | १) ज्यांनी पदवी धारण केलेली आहे.<br>२) इंटरमिजिएट ग्रेड ड्रॉईंग परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>३) एम.एस.सी.आय.टी. परीक्षा किंवा संगणक ज्ञानाची समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावा. किंवा नियुक्तीनंतर दोन वर्षात सदर परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. |
| ३. | शिपाई (गड-ड) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे. (१० वी उत्तीर्ण) |

| अ.क्र. | कार्यक्रम | कनिष्ठ लिपिक-नि-टंकलेखक |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अर्ज स्वीकारण्याचा शेवटचा दिनांक : | १५.१.२०२० सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |
| २ | लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवाराची तात्पुरती यादी प्रसिद्ध करणे : | १६.१.२०२० |
| ३ | तात्पुरत्या यादीवरील आक्षेप स्वीकारण्याचा अंतिम दिनांक : | १८.१.२०२० सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |
| ४ | लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करणे : | २०.१.२०२० |
| ५ | उमेदवारांना परीक्षा केंद्राचे नाव, आसन क्र. वेबसाईटवर प्रसिद्ध करण्याचा दिनांक : | २३.१.२०२० |
| ६ | लेखी परीक्षा दिनांक : | २५.१.२०२० |
| ७ | लेखी परीक्षेचा निकाल प्रसिद्ध करण्याचा दिनांक : | २८.१.२०२० |
| ८ | अंतिम निवड यादी प्रसिद्ध करणे | २९.१.२०२० |

सरळ सेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात, अर्जाचा नमुना, परीक्षेचे हॉल तिकीट इ. माहिती सा.बां. विभागाच्या www.mahapwd.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच वेळोवेळी भरती प्रक्रियेसंबंधित माहिती उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. भरती प्रक्रिया स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत. याबाबत कोणालाही, कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन, शासन निर्णय क्रमांक बीसीसी२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब/मंत्रालय, मुंबई दिनांक २१ डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये सदर भरती ही अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रधारक उमेदवारांमधून भरावयाची असल्याने केवळ जात वैधता प्राप्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करावे.

**अर्ज स्वीकारण्याचे स्थळ : कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जळगाव, बांधकाम भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जिल्हापेठ, जळगाव, पिन ४२५ ००१**

सही/-
(पी.पी. सोनवणे)
अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, जळगाव

डी.जी.आय.पी.आर. २०१९/२०२०/४३७४